# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मनपा वाहनावर बाह्ययंत्रणेव्दारे खाजगी वाहनचालक एक वर्ष कालावधीकरीता पुरविणे.**

**प्रस्तावना :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वाहनचालकाची एकूण मंजुर पदे १६३ असून त्यातील ८३ वाहनचालक हे विविध विभागात कार्यरत आहेत. अग्निशमन व आणीबाणी सेवा व वैदयकिय आरोग्य विभाग हे अत्यावश्यक सेवेत येत आहे. वाहनचालकाची कमतरता असल्याने अग्निशमन वाहन वर्दीवर काढणे कामी अग्निशमन विभागाच्या सेवेत अडथळा निर्माण होत असल्याने अग्निशमन विभागाकडे कार्यरत असलेल्या ०७ वाहनांवर व वैद्यकिय आरोग्य विभागाकडे कार्यरत ०४ वाहनांवर शिफ्ट नुसार नियोजन करणे कामी खाजगी वाहनचालकांची आवश्यकता आहे.

तसेच वाहन व आरोग्य विभागामार्फत डंपर, टँकर, जेसीबी, पोकलन इत्यादी प्रकारच्या नविन वाहनांची खरेदी करण्यात येत असुन सदर वाहनांवर मनपा वाहनचालक अपुरे पडणार असल्याने खाजगी वाहनाचालकांची आवश्यकता आहे. खाजगी वाहनचालकांची सेवा बाहययंत्रणेव्दारे पुरविणे कामी वार्षिक निविदा प्रसिद्ध करणे कामी दि.३०/०६/२०२३ रोजी प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मनपा वाहनावर बाह्ययंत्रणेव्दारे खाजगी वाहनचालक एक वर्ष कालावधीकरीता पुरविणे कामीची निविदा सुचना क्र.२, सन २०२३-२४ (महाटेंडर ई-निविदा क्र.९३२३०५) दि.०४/०८/२०२३ ते दि.१८/०८/२०२३ या कालावधीत प्रसिध्द करण्यात आली असता सदर निविदेमध्ये १) M/s. Leena M Mundhe, २) M/s. Sai Baba Traders, व ३) M/s. Snehal Decoretors या ०३ प्रा निविदाकारांनी सहभाग घेतला असुन सदर निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी निविदा समिती मार्फत केली असता तीन्ही निविदाकरांना निविदा समितीने पात्र ठरविले आहे.

पात्र निविदाकारांचे प्राईज बिड लिफाफा दि.२७/०९/२०२३ रोजी उघडला असता खालील तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे प्रति वाहनचालक एक वर्ष कालावधीकरीता (१२ महिने) पुरविणे कामी खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | निविदाकांराचे नाव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १) | M/s. Sai Baba Traders | रु.२८६८८३/- |
| २) | M/s. Leena M Mundhe | रु.२८६९२०/- |
| ३) | M/s. Snehal Decoretors | रु.३०३६००/- |

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मनपा वाहनावर बाह्ययंत्रणेव्दारे प्रति खाजगी वाहनचालक एक वर्ष कालावधीकरीता (१२ महिने) पुरविणे कामी सर्वात कमी दर L1 चे निविदाकार M/s. Sai Baba Traders यांचे प्रति वाहनचालक एक वर्ष कालावधी करीता पुरविण्याचे दर रक्कम रु.२,८६,८८३/- असे असुन ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.१४% ने कमी असल्याने त्यादरास मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.०९/११/२०२३ रोजी मान्यता प्रदान केली आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मनपा वाहनावर बाह्ययंत्रणेव्दारे खाजगी वाहनचालक एक वर्ष कालावधीकरीता पुरविणे कामी मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दि.१० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा. आयुक्त सो यांना प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आले असल्याने मा. स्थायी समितीचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांना प्राप्त झाले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दि.१० जुन २०२२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी या

पोट- कलमान्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये मा. स्थायी समिती यांची मान्यता मिळणे कामी सादर.

**स्थायी समिती ठराव क्र :-** ३०० **दिनांक :-** ०६/१२/२०२३

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाकरीता मनपा वाहनावर बाह्ययंत्रणेव्दारे प्रति खाजगी वाहनचालक एक वर्ष कालावधीकरीता (१२ महिने) पुरविणे कामी सर्वात कमी दर L१ चे निविदाकार M/s. Sai Baba Traders यांचे कडुन प्रति वाहनचालक एक वर्ष कालावधी करीता पुरविण्याचे दर रक्कम रु.२,८६,८८३/- या दराने पुरविणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, मा. स्थायी समिती/ प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(अजय वैद्य)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**विषय:- कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोन करणेकामी वाहन विभागातील इतर लेखाशिर्षातुन निधी वर्ग करणे.**

**मे. सादर,**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एम.सी.ओ. २०२०/७१(भाग-२)/ नवि-१४, दिनांक.०६/०६/२०२२ अन्वये महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१ अ) तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या या अधिनियमाखालील सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी या पोट-कलमान्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे अधिकार आहे. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतुद करणे हे मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे अधिकार आहे. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले जातात. त्याप्रमाणे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतुद करण्यात आली होती. या तरतुदी मधुन आतापर्यंत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील नमुद केल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन २०२३-२४ करीता करण्यात आलेली तरतुद | सन २०२३-२४ करीता करण्यात आलेली तरतुद (पुर्नविनियोजन नंतर) | सन २०२३-२४ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | दि.२९/०५/२०२३ पर्यतची शिल्लक | मार्च २३ पर्यंत येणारा अंदाजे अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाहनांची दुरुस्ती व निगा, साधने, टायर्स, वाहनांचे सुटे भाग खरेदी | रु.१३५.०० लक्ष | रु.८५.०० लक्ष | रु.५३.५७ लक्ष | रु.३१.४३ लक्ष | रु.३१.४३ लक्ष |
| २ | कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे. | रु.८०.०० लक्ष | रु.१६०.०० लक्ष | रु.१५९.७३ लक्ष | रु.०.२७ लक्ष | रु.७६.१८ लक्ष |
| ३ | मालमत्ता व वाहनांचा विमा | रु.३६.०० लक्ष | रु.३६.०० लक्ष | रु.१२.२३ लक्ष | रु.२३.७७ लक्ष | रु.२३.७७ लक्ष |
| ४ | वाहन भत्ता | रु.६०.०० लक्ष | रु.३५.०० लक्ष | रु.७.०८ लक्ष | रु.२७.९२ लक्ष | रु.२१.९२ लक्ष |
| ५ | महानगरपालिकेच्या वाहनांनासाठी पेट्रोल, डिझेल व ऑईल इत्यादी खरेदी | रु.१३०.०० लक्ष | रु.१२५.०० लक्ष | रु.६९.१९ लक्ष | रु.५५.८१ लक्ष | रु.५५.८१ लक्ष |
| ६ | वाहने खरेदी | रु.१५०.०० लक्ष | रु.१५०.०० लक्ष | रु.६९.७५ लक्ष | रु.८०.२५ लक्ष | रु.९.२५ लक्ष |

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता ८० लक्ष तरतुद करण्यात आली होती.

परंतु माहे एप्रिल २०२३ पासुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेकडे असलेल्या १५ वर्षापेक्षा जास्त जुन्या ४८ वाहनांचा वापर बंद करण्यात आला असुन व प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे मार्फत MSTC या संकेतस्थळावर सदर वाहनांची लिलाव प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

महानगरपालिकेची सर्व डंपर, टँकर, जेसीबी वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे मार्फत राबविण्यात आलेल्या लिलाव प्रक्रीयेत समाविष्ठ असल्याने प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे अतिक्रमण व रोड खाते विभागास प्रत्येकी डंपर व उद्यान विभागास एक टँकर व प्रभाग समिती क्र.३ व ४ करीता प्रत्येकी एक जीप वाहन माहे जुन २०२३ पर्यंत भाडेतत्त्वावरील पुरविण्यात आले आहे. सदर भाडेतत्त्वावरील वाहने उपलब्ध करणे कामी कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मधील आर्थिक तरतुदीचा वापर करण्यात आला असल्याने कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मध्ये मार्च २०२४ पर्यत निधीची कमतरता होती त्यामुळे वरील तक्त्यानुसार वाहनाविभागातील इतर तरतुदी मधुन रक्कम रु.८० लक्ष कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या तरतुदी मध्ये पुर्नविनियोजन करण्यात आले होते.

परंतु महानगरपालिकेच्या प्रशासकीय वापराकरीता खरेदी करण्यात येणारी ०६ नग डंपर व ०४ नग टँकर वाहने महानगरपालिकेस माहे सप्टेंबर २०२३ पर्यंत प्राप्त न झाल्यामुळे प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे अतिक्रमण व रोड खाते विभागास ५ डंपर तसेच प्रभाग समिती क्र. १ ते ५ बांधकाम विभागास ०५ डंपर वाहने तसेच प्रभाग समिती क्र.३

व ४ करीता प्रत्येकी एक जीप वाहन माहे सप्टेंबर २०२३ पर्यंत भाडेतत्त्वावार इंधन व वाहनचालकांसह पुरविण्यात आले आहेत.

महानगरपालिकेच्या प्रशासकीय वापराकरीता खरेदी करण्यात येणारी ०६ नग डंपर व ०४ नग टँकर वाहने महानगरपालिकेस माहे ऑक्टोबर २०२३ पासुन महानगरपालिकेच्या प्रशासकीय वापराकरीता उपलब्ध झाले आहेत.

परंतु माहे जुन २०२३ अंती पुर्नविनियोजन केल्याल्या तरतुदीचा वापर प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे अतिक्रमण व रोड खाते विभागास ५ डंपर तसेच प्रभाग समिती क्र. १ ते ५ बांधकाम विभागास ०५ डंपर वाहने तसेच प्रभाग समिती क्र.३ व ४ करीता प्रत्येकी एक जीप वाहन माहे सप्टेंबर २०२३ पर्यंत पुरविणे कामी करण्यात आला असल्याने सद्य:स्थितीत कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे लेखार्शिर्षात रक्कम रु.०.२७ लक्ष मात्र शिल्लक आहे.

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षा अंतर्गत शासनाकडुन प्रतिनियुक्तीने आलेले अधिकारी वर्ग यांना कार्यालयीन कामाकरिता वाहने पुरविणे, महानगरपालिकेचे अधिकारी व विभाग यांना मागणी नुसार भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे, घरपट्टी पाणीपट्टी वसुली मोहिम राबविणे कामी भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे, पल्स पोलिओ मोहिमेकामी भाडेतत्वावर जीप वाहने पुरविणे, तसेच शासनाच्या दौरे व इतर कार्यक्रमांकरीता कालावधीमध्ये प्रशासकीय कामकाजाकरीता भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे कामी निधीची कमतरता आहे. कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या वाहन विभागातील कामांची यादी व अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष व कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| | कार्यालयीन कामाकरीता भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे. | |
| १) | १. मा. सहाय्यक आयुक्त श्रीम.प्रणाली घोंगे मॅडम<br>२. मा. मुख्य लेखा परीक्षक सो. (१३/०९/२०२३ पासुन ३१/०३/२०२३ पर्यंत)<br>३. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी सो. श्री किरण तायडे सो.<br>४. मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी सो. श्रीम. बुशरा सय्यद<br>५. मा. शहर अभियंता सो. (एस.जी. भट)<br>६. मा. सहा. आयुक्त (आस्थापना विभाग) श्री. बाळाराम जाधव<br>७. निवडणुक विभाग प्रमुख, श्री. नितीन पाटील. | रु.२८,३७,९४०/- |
| | ८. मा. सहाय्यक आयुक्त सो. प्रभाग समिती क्र. ३<br>९. मा. सहाय्यक आयुक्त सो. प्रभाग समिती क्र. ४ | रु.८,४०,०००/- |
| | या अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामाकरिता माहे दि.२० ऑक्टोंबर २०२३ ते मार्च २०२४ (५ महीने) या कालावधीकरीता ७ कार व २ जीप वाहने भाडेतत्वावर पुरविणेत येत आहेत. | **रु.३६,७७,९४०/-** |
| २) | १) करमुल्यांकन विभाग, सुरक्षा विभाग, क्रिडा विभाग या विभागांचा अतिरीक्त पदभार असल्याने (श्री. सुदाम जाधव) यांच्या करीता चार महिने कालावधी करीता एक कार वाहन पुरविणे. | रु.२,९२,३२०/- |
| | २) भरारी पथक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांना एक अवातानुकूलीत जीप वाहने पुरविणे.<br>३) मुख्यालय, वाहन विभाग<br>मंत्रालय अथवा इतर ठिकाणी कोणत्याही विभागाचे अधिकारी/कर्मचाऱ्यांना फाईल्स घेऊन जाण्यासाठी व जनसपर्क अधिकारी यांना आवश्यक असल्यास प्रशासकीय कामकाजाकरीता २ अवातानुकूलीत जीप वाहने पुरविणे.<br>संदर्भ :- जा.क्र.भिनिशमनपा/आयुक्त कार्या/१८७/२०२३ दि.०९/११/२०२३ नुसार चार महिने कालावधी करीता ३ अवातानुकूलीत जीप वाहने पुरविणे. | रु.१०,०८,०००/- |
| | या अधिकारी व विभाग यांना कार्यालयीन कामाकरिता चार महिने कालावधी करीता १ कार व ३ अवातानुकूलीत जीप वाहने भाडेतत्वावर पुरविणे आवश्यक आहे. | **रु.१३,००,३२०/-** |
| २ | घरपट्टी पाणीपट्टी वसुली मोहिमराबविणे कामी प्रभाग समिती क्र. १ ते ५ करीता ५ जीप वाहने ४ महिने कालावधीकरीता भाडेत्त्वावरील वाहने पुरविणे (अंदाजे खर्च रु.१६.८० लक्ष) पल्स पोलिओ लसीकरण मोहिमे करिता (अंदाजे ०२ मोहिमे कामी) | **रु.२०,४०,०००/-** |

| | | |
|---|---|---|
| | भाडेत्त्वावरील वाहने पुरविणे. (अंदाजे खर्च रु.३.६० लक्ष) | |
| ४ | शासनांच्या दौरे व इतर कार्यक्रमांकरीता भाडेतत्तवावरील वाहने पुरविणे. | रु.६,००,०००/- |
| | **एकुण** | **रु.७६,१८,२६०/-** |

तरी वाहन विभागातील भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत मार्च २०२४ पर्यंत खर्च करणे कामी रु.०.२७ लक्ष मात्र तरतुद शिल्लक असुन तरतुद अपुरी पडत असल्याने उपरोक्त कामाकरिता वाहन विभागातील वाहन भत्ता लेखाशिर्षात रु.२७.९२ लक्ष शिल्लक असुन सदर निधीमधुन रु.६ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे व वाहने खरेदी या लेखाशिर्षात रु.८०.२५ लक्ष शिल्लक असुन सदर निधीतुन ७१ लक्ष भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग म्हणजेच पुर्नविनियोजन करण्याबाबतचे निर्देश मा. प्र. वाहन व्यवस्थापक सो. यांनी दिले आहेत.

तरी वाहन विभागातील वाहन भत्ता लेखाशिर्षामधील रु.६ लक्ष तरतुद व वाहने खरेदी या लेखाशिर्षामधील रु.७१ लक्ष तरतुद भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग म्हणजेच पुर्नविनियोजन प्रस्तावास मा. आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोन करणेकामी कामीच्या प्रस्तावास मा. महासभेची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दिनांक १० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा. आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा. महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षे नुसार उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** ३०१ **दिनांक :-** ०६/१२/२०२३

वाहन विभागातील भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत मार्च २०२४ पर्यंत खर्च करणे कामी रु.०.२७ लक्ष मात्र तरतुद शिल्लक असुन तरतुद अपुरी पडत असल्याने उपरोक्त कामाकरिता वाहन विभागातील वाहन भत्ता लेखाशिर्षात रु.२७.९२ लक्ष शिल्लक असुन सदर निधीमधुन रु.६ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे व वाहने खरेदी या लेखाशिर्षात रु.८०.२५ लक्ष शिल्लक असुन सदर निधीतुन ७१ लक्ष भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग म्हणजेच पुर्नविनियोजन करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोजन करणे कामी वाहन विभागातील इतर लेखाशिर्षातुन निधी वर्ग करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(अजय वैद्य)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**